विषयातील कोणताही एक विषय" घेता येईल. "कर्णबधिर" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "बहुविकलांग" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "अध्ययन अक्षमता" असलेल्या विद्यार्थ्यांना " **दोन** भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय **प्रत्येक** विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "ऑटिस्टीक" विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण विषयांतर्गत ९ विषयांपैकी विषय" निवडण्याची सोय आहे. "कार्यशिक्षण या विषयातील पुढे नमूद केलेल्या ०९ विषयांपैकी कोणताही एक विषय" विषयाला पर्याय म्हणून घेता येईल.

१. **घरगुती विद्युत उपकरणे - (J-1)**
२. **दूध व दूधाचे पदार्थ - (J-5)**
३. **हस्तभरतकाम - (J-9)**
४. **शिवणयंत्राद्वारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती - (K-1)**
५. **टाकाऊ वस्तूंपासून सौंदर्यकृती - (K-5)**
६. **पाककला - (L-7)**
७. **भारतीय संगीत - (M-3)**
८. **चित्रकला व रंगकाम - (M-6)**
९. **कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तक बांधणी - (M-7)**

जून २०१२ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. परंतु हे सर्वच विषय "विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थी" त्यांच्यातील शारीरीक दोषांच्या कमतरतेमुळे विषय परिचित झालेले आहेत. (त्यामुळे यावर्षी इ.९वीच्या वर्गात जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत, त्यांना या "कार्यशिक्षण" विषयाबाबत शाळेत या विषयांतर्गत जो विषय श्रेणीसाठी शिकविला जात होता, त्याबाबत संपूर्ण माहिती असणार आहे. त्यांची परीक्षा ही त्या त्या शाळेत मंडळ नियमाप्रमाणे घेण्यात यावी. परंतु ज्या "विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी" हा "कार्यानुभव विषय" "भाषेसाठी पर्यायी विषय" म्हणून घेतला असेल, तर त्या विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा आयोजित करावी. (कारण अनेक विशेष शाळेत (special school) या पुस्तकेतील अभ्यासक्रमाप्रमाणे शिकविले जात आहे.))

इ. १० वीच्या प्रचलित भाषा विषय योजनेत कोणताही बदल केलेला नाही. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची नवीन मूल्यमापन योजना मंडळाने तयार केलेली आहे. विशेष गरजा असलेले जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यांना फक्त कार्यशिक्षण या विषयाची मूल्यमापन योजना प्रचलित प्रमाणेच राहील, त्यात कोणताही बदल नाही. परंतु, विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनी भाषाऐवजी गणित या विषयाबरोबर कार्यशिक्षणातील कोणताही विषय भाषेला